Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

58

# प्राचीन ते आधुनिक काळातील कर्तृत्ववान स्त्रिया

**प्रा. काळे संजय पांडूरंगराव**
दिगंबरराव बिंदू महाविदयालय भोकर
ता. भोकर जि. नांदेड

**काळे अक्षय अरूण**
संशोधक विदयार्थी
स्त्री अध्ययन केंद्र
सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ पुणे

**प्रस्तावना :**

जगातील प्रत्येक देशाची संस्कृती, प्रकृती, इतिहास, चालीरिती, मानसिकता, आणि परिस्थिती भिन्न स्वरूपाची आहे. त्यामुळे प्रत्येक देशात पुरूषाच्या तुलनेत महिलाचे स्थान हे सापेक्ष राहीले आहे. प्रत्येक देशात , सामाजात मिळणारी वागणूक ही वेगळी आहे. त्या ठिकाणच्या समाजाच्या मानसिकतेवर तेथील स्त्रीयाचे राहणीमान ठरवले जाते. केवळ आपल्या भारताचाच विचार केला तर प्रत्येक राज्यात तेथील महिलाचे जीवन हे वेगवेगळया स्वरूपामध्ये दिसतो. त्याना एकसारखी वागणूक मिळत नाही. राजकीय पातळीवर येवून आपण जर जगभरातील देशातील परिस्थितीचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, राजकारणात पुरूषाच्या बरोबरीतील महिलाना कधीही मिळालेले नाही. महिलाकडे विशेषता राजकीय क्षेत्रात तरी लोकाचा पाहण्याचा दृष्टिकोन हा दुय्यम असल्याचा दिसून येतो. आपला इतिहास जर पाहीला तर असे दिसून येतो की जे राजे--महाराजे, राज्यकर्ते होवून गेले त्यामध्ये महिला राज्यकर्ते म्हणून अपवादात्मक किवा क्वचितच दिसून येतात. यावरून कळते की महिलाचे जीवन किती बंधनात्मक आणि मर्यादित होते. एवढे सर्व असतानाही काही अतिशय महत्वकांक्षी व कर्तृत्ववान महिला इतिहासात होवून गेल्या. त्याचे जीवन आजच्या महिलाना तसेच पुरूषाना प्रेरणादायी आहे. त्याचा इतिहास आज समोर येणे आवश्यक आहे. त्यातील काही मुख्य महिलाचे विवेचण पुढील प्रमाणे करता येईल

**रझिया सुलतान** : (1205 ते 1240)

सुलतान मुस्लीम तसेच तुर्की इतिहासातील पहिलीच एक महिला शासक होती. इल्तुतमिश याने आपल्या मोठया मुलाला वारसदार केले होते परंतू त्याच्या मुलाचा मृत्यू झाल्यामुळे त्याची मुलगी रझिया ही सूलतान बनली. रझिया ही खूप महत्वकांक्षी होती. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी ती उत्तम लढव्इ म्हणून नाव लौकिक मिळवले. दिल्ली तख्तावरील ती पहिली व शेवटची सम्राज्ञी होती. संघर्षमय राज्यकारभार करून तीने 1236 ते 1240 असा राज्य कारभार संभाळला जमालउद्दीन याकुत या आफ्रिकन सिद्धी या जवानावर तीचे प्रेम होते. पण याला विरोध करणारा अल्तमश याने याकुतचा खून केला व रझियाला विवाहास भाग पाडले. मात्र याच दरम्यान सत्तेवर आलेला तिचा सावत्रभाऊ बेहरान याने अल्तमश व रझिया याना ठार केले.

**रूद्रमादेवी : (1279 ते 1289)**

भारतात महिला राज्यकर्ती म्हणून दुसरे असे नाव आहे. जे आपल्या न्यायप्रिय, शांतताप्रिय, व समाजहितदक्ष यामूळे ओळखले जाते. सन 1279 ते 1289 95 याकाळात दक्षिण भारतात काकतीय राजवंशातील ती राणी म्हणजे रूद्रमादेवी वयाच्या तेराव्या चौदाव्यावर्षी राज्याची सुत्रे हाती घेतलेल्या या राणीला तीच्या वडीलानी गणपती देवाने तीला मुलासारख्ये वाढवले. रूद्रमादेवी चे नाव भारतीय इतिहासात सुवर्ण अक्षरात कोरले आहे.

**राणी दुर्गावती** :

त्यानंतर आणखी एक नाव आहे ज्याचा इतिहासामध्ये नाव लौकिक मिळवला आहे. 1524 ते 1564 या काळामध्ये गोंडवाना राणी दुर्गावती या संस्थानचे राणी होती तीचा पती दलपत शाह याच्या अचानक मृत्यू नंतर ती तीच्या

चार वर्षाच्या मुलाला वीर नारायणाला सिंहासनावर बसून राज्याची सुत्रे उत्तमरित्या संभाळली तीने सम्राट अकबरला युद्धामध्ये चोख प्रतीउत्तर दिले. व लढता लढता प्राण्याची आहूती दिली

सतराव्या शतकात प्रत्येक्ष राजकारभार न करताही राजकारणाला नवी दिशा देणारी **राजमाता** म्हणून ज्याचे नाव घेतले जाते त्या **राजमाता जिजाबाई** हया सूद्धा अतिशय कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व होते. त्यानंतर मराठी शाही मध्ये नाव घेतले जाते **महाराणी ताराबाई** अत्यंत प्रतिकूल परिस्थिती मध्ये त्यानी राज्याची सुत्रे संभाळली

भारताच्या इतिहासामध्ये कर्नाटकातील कित्तुर राज्याची राणी 1778 ते 1829 या काळात **राणी चेन्नम्मा** होती 1824 मध्ये त्यानी इंग्रजाच्या खालसा धोरणाचा विरोध केला व यामध्ये त्याना आपले बलिदान दावे लागले. राणी चेन्नम्मा नंतर 19व्या शतकाच्या मध्यावर ज्याची ओळख त्याच्या रंणागंणातील पराक्रमाणी केले जाते त्या झाशी संस्थाच्या **राणी लक्ष्मीबाई** वारसा हक्क नामंजूर व इंग्रजाच्या जुलमी धोरणाला नाराज होवून त्यानी ब्रिटिशाविरूध युदध पुकारले. व ब्रिटिशाविरोधात त्वेशाने लढा दिला. त्याच लढयामध्ये राणी लक्ष्मीबाईच्या सहकारी व त्याच्या सैन्यातील एक सेनानी **वीर झलकारबाई** यानी पण खूप मोठा प्राक्रम गाजवला एक अत्यंत साधारण कुटूंबा मधून येवून 19 व्या शतकात जेते स्त्रीयाना मुक्तपणे वावरण्याची सुदधा मुभा नव्हती तरी वीर झलकारबाई नी आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले.

गेल्या काही दशकाचा अभ्यासाच्या निष्कर्षा नुसार समाजातील स्वतःचे न्याय स्थान जगभरात तसेच भारतात महिलाना पुरूषाप्रमाणे स्वातंत्र्य मिळाले नाही. गेल्या शतक भरात त्याना कराव्या लागलेल्या संघर्षात आणि त्यातून महिलानी साधलेल्या प्रगतीचा थोडक्यात प्रवास 1950 मध्ये **प्रेमा माथूर** याना भारतातील पहिल्या महिला वैमानिक होण्याचा मान मिळवला, 1952 त्याच्या ऑलम्पीक स्पर्धेत पुरूष व महिलाना एकत्र खेळण्याची संधी, भारताच्या पहिल्या महिला **पंतप्रधान इंदिरा गांधी,** तसेच भारताच्या महिला राज्यपाल म्हणून **सरोजणी नायडू, सुचेता कृर्पलानी** याना भारताच्या पहिल्या मुख्यमंत्री होणाचा मान भारतीय पोलीस दलात अधिकारी पदावर **किरण बेदी** याची निवड, **मदर तेरेसा** याना शांततेच **नोबेल पूरस्कार** जाहीर, भारतीय सैन्य दलाल महिलाचा प्रवेश, पहिली महिला भारतीय अंतराळवीर म्हणून **कल्पना चावला** तसेच **सुनिता विल्यमस** , भारतामधील सर्वाच्च पदावर म्हणजेच राष्ट्रपती म्हणून **प्रतीमाताई पाटील** याची निवड, **लंता मंगेशकर** याना भारताचा सर्वाच्च पुरस्कार भारतरत्न म्हणून गौवरण्यात आले तसेच भारतात स्थानिक स्वराज संस्थेमध्ये महिलाना 50 टक्के आरक्षण मिळाले आहे परूषाप्रमाणे महिलानी इतरही क्षेत्रात प्राविण्य मिळवले आहे. महिलानी ही पुरूषा प्रमाणे खेळामध्ये वर्चस्व गाजवले आहे **सानिया नेहवाल, सानिया मिर्झा, तसेच पी.व्ही. सिंधू, साक्षी मलीक, मेरी कोम** यानी विशेष प्राविण्य मिळवले आहे.

❑❑❑